लोकमत

# शिवाजी विद्यापीठ येथे भुयारी मार्गासाठी साडेआठ कोटी मंजूर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची मुख्य इमारत आणि समोरच्या रस्त्यापलीकडील विभाग यांना जोडणाऱ्या भुयारी मार्गासाठी आठ कोटी ४८ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यासाठी तातडीने कार्यवाही करत निर्णय घेतला आहे.

शिवाजी विद्यापीठाचा एकूण परिसर ८५३ एकर आहे. या जागेतून पूर्वीचा राष्ट्रीय महामार्ग आणि सध्या कोल्हापूर महापालिकेचा रस्ता जातो. या रस्त्याचे चौपदरीकरण झाले आहे. विद्यापीठाच्या पश्चिम भागात प्रशासकीय इमारत, विविध अधिविभागांच्या इमारती, क्रीडा संकुल अशा अनेक इमारती अनेक वर्षांपूर्वी बांधण्यात आल्या आहेत. तर समोरच्या पूर्व भागात तंत्रज्ञान, स्कूल ऑफ नॅनो सायन्स, शाहू संशोधन केंद्र, शिक्षणशास्त्र, यशवंतराव चव्हाण रूरल डेव्हलपमेंट, पत्रकारिता व संवादशास्त्र विभागाच्या इमारतीही उभारण्यात आल्या आहेत. वाहनांची सततची वर्दळ या रस्त्यावरून असल्याने हा रस्ता असुरक्षित बनला आहे. त्यामुळे भुयारी मार्ग आणि सेवा रस्त्याचे ८ कोटी ४८ लाख ८१ हजार रुपयांचे अंदाजपत्रक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांची मान्यता घेऊन सादर केले होते.

लोकसत्ता

# डॉ. जगन कराडे यांच्या ग्रंथास पुरस्कार




डॉ. जगन कराडे यांना डॉ. आंबेडकर वेलफेअर असोशिएशन मलेशियाचे अध्यक्ष दौतक पंजामूर्ती यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांच्या ग्रंथास आंतरराष्ट्रीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार प्रदान करण्यात आला. मलेशियातील बाबासाहेब आंबेडकर वेल्फेअर असोसिएशन आणि जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन क्वालालंपूर येथे झाले. मलेशियाच्या मंत्री कंडासामी, डॉ. आंबेडकर वेल्फेअर असोसिएशन मलेशियाचे अध्यक्ष डी. के. पंजामूर्ती, नेताजी सुभाषचंद्र बोस भारतीय सांस्कृतिक केंद्राचे राम्या हिरियन्नैया, संमेलनाचे अध्यक्ष डॉ. उत्तम अंभोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. संमेलनातील एका परिसंवादाचे ते अध्यक्ष व दुसऱ्या परिसंवादामध्ये ते वक्ते म्हणून हजर होते. डॉ. कराडे यांचे १५ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. गतवर्षी त्यांची पीएच. डी. ग्रंथाची सहावी आवृत्ती लंडन मधून प्रकाशित होत असतानाच मराठी समाजशास्त्र परिषदेने डॉ. सूर्यकांत घुगरे उत्कृष्ट संशोधन ग्रंथ पुरस्कार दिला आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठासमोर साकारणार भुयारी मार्ग

## ८.४८ कोटींचा प्रस्ताव : अपघातांना बसणार आळा

**कोल्हापूर : सुनील सकटे**

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडणारा भुयारी मार्ग, सर्व्हिस रोडसाठी आठ कोटी ४८ लाख ८१ हजार रुपये किमतीच्या अंदाजपत्रकास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबतचा प्रस्ताव पाठविला होता.

या कामाचा खर्च शिवाजी विद्यापीठ विकास निधीतून केला जाणार आहे. या भुयारी मार्गामुळे शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारत परिसरातून समोरील अधिविभागांकडे जाण्याचा मार्ग सुकर होणार आहे. भुयारी मार्गामुळे या परिसरातील अपघातांना आळा बसणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचा विस्तीर्ण परिसर जुन्या पुणे-बंगळूर महामार्गामुळे पूर्व व पश्चिम असा विभागाला आहे. या रस्त्याचे चौपदरीकरण, रस्ता दुभाजक आणि पादचारी फूटपाथचे काम पूर्ण झाले आहे. विद्यापीठाच्या **पान ८ वर ▸**

## शिवाजी विद्यापीठासमोर साकारणार भुयारी मार्ग

(पान १ वरून) पश्चिम भागात सध्या मुख्य प्रशासकीय इमारत व गेल्या ५० वर्षांत उभारलेल्या विविध अधिविभागांच्या इमारती, क्रीडा संकुल इत्यादी इमारती आहेत; तर पूर्व भागात विद्यापीठाचा माहिती तंत्रज्ञान अधिविभाग, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, शाहू रिसर्च सेंटर, शिक्षणशास्त्र आदी अधिविभाग आहेत. तसेच पूर्व बाजूस यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, जर्नालिझम व मास कम्युनिकेशन सेंटर, कन्व्हेंशन सेंटर इत्यादी इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या मुख्य रस्त्यावरून विद्यापीठातील विद्यार्थी, पालक, शिक्षक अशा सुमारे दोन ते तीन हजार नागरिकांची दररोज ये-जा सुरू असते. या रस्त्यावर पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरून शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. वर्दळीमुळे नागरिकांना हा रस्ता ओलांडणे जीवघेणे ठरत आहे. या ठिकाणी अनेकदा लहान-मोठे अपघाताचे प्रकारही घडले आहेत. त्यामुळे विद्यापीठाने भुयारी मार्ग व सर्व्हिस रोडसाठी आठ कोटी ४८ लाख ८१ हजार रुपयांचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता कार्यालयाच्या तांत्रिक मान्यतेने राज्य शासनाकडे मान्यतेसाठी पाठविले होते. या प्रस्तावास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

पुढारी

# स्पर्धा परीक्षार्थींना मोफत मुलाखतीचे प्रशिक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने पीएसआय, आयबीपीएस, मुख्य परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून मुलाखतीचे मोफत मार्गदर्शन केले जाणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी २१ फेब्रुवारीपर्यंत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात नावनोंदणी करावी, असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, डॉ. प्रल्हाद माने, कायदे सल्लागार अनुष्का कदम आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 FEB 2023

सकाळ

# विद्यापीठाचा पूर्व व पश्चिम भाग जोडण्यासाठी भुयारी मार्ग

**कोल्हापूर, ता. १६ :** शिवाजी विद्यापीठाचा पूर्व व पश्चिम भाग कायमस्वरूपी जोडण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्यास शासनाने मंजुरी दिली. या कामासाठी आजच आठ कोटी ८१ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या संदर्भातील आदेश आज काढले.

विद्यापीठाचा सुमारे ८५३ एकराचा विस्तीर्ण परिसर महापालिकेच्या ताब्यात असलेल्या जुन्या पुणे-बंगळूर महामार्गाच्या पूर्व व पश्चिम बाजूस विभागला आहे. या जुन्या महामार्गाचे चार पदरीकरण झाले आहे, त्याशिवाय रस्त्यावर दुभाजक आहेत. पुटपाथ व अन्य रस्ता मिळून ३३ मीटरचे रुंदीकरण झाले आहे. विद्यापीठाच्या पश्चिम भागात मुख्य प्रशासकीय इमारतीसह विविध अधिविभागाच्या इमारती, क्रीडा संकुल तर पूर्व भागात विद्यापीठाचा तंत्रज्ञान, स्कुल ऑफ नॅनो सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी, श्री. शाहू रिसर्च सेंटर, शिक्षणशास्त्र आदी विभाग आहेत.

भविष्यात पूर्व भागात यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट आदी इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. विद्यापीठातील विद्यार्थी, पालकांसह सुमारे दोन ते तीन हजार लोक मुख्य रस्त्यावरून दररोज पूर्व व पश्चिम भागात ये-जा करतात. या मार्गावरील वाहनांची वाढती संख्या व त्यामुळे होणाऱ्या संभाव्य अपघाताच्या पार्श्वभूमीवर पुर्व व पश्चिम विभागाला जोडणारा भुयारी मार्ग विद्यापीठाने प्रस्तावित करून त्यासाठी निधीची मागणी केली होती. त्यासाठी आठ कोटी ८१ लाख रुपयांची मागणी केली होती. या मागणीला अनुसरून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने भुयारी मार्गासाठी हा निधी मंजूर केला.